Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/डीपी/ 1211
दिनांक:-०१/०८/२०२३

प्रति,

सर्व परिरक्षक व केंद्रसंचालक
जिल्हा - सातारा/सांगली/ कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) जुलै-ऑगस्ट २०२३ परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत.**

संदर्भ :- १. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं. /परीक्षा-६/३३५५ दि.०१.०८.२०२३
२. क्र.रा.मं./परीक्षा -६/३९४६ दिनांक १९/०७/२०२३ चे पत्र.
३. क्र.रा.मं./परीक्षा -६/३३२६ दिनांक २७/००७/२०२३ चे पत्र.
४.या कार्यालयाचे क्र.कोविमं/डीपी/११०७/दि.२०/०७/२०२३
५.या कार्यालयाचे क्र.कोविमं/डीपी/११६५/दि.२८/०७/२०२३

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३ परीक्षा दि.१८/०७/२०२३ ते दि.०१/०८/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि राज्यातील काही जिल्हयामध्ये दि.२०/०७/२०२३ व दि.२८/०७/२०२३ रोजी अतिवष्टीचा इशारा देण्यात आला होता त्यानुसार शासनामार्फत शाळांना सुटी जाहिर करण्यात आलेली होती. सबब सदर दिवसाचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षांचे पेपर अनुक्रमे दि.०२/०८/२०२३ व दि.०३/०८/२०२३ रोजी आयोजित केल्या बाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तरी या प्रकरणी आपणास पुनश्च कळविण्यात येते की उपरोक्त दि.२०/०७/२०२३ व दि.२८/०७/२०२३ रोजीचे आयोजित पेपर सुधारित वेळापत्रकाप्रमाणे अनुक्रमे दि.०२/०८/२०२३ व दि.०३/०८/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली असल्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व केंद्रसंचालक ,संबंधित मुख्याध्यापक,माध्यमिक शाळा,विद्यार्थी व पालक यांना अवगत करावे व कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**महत्वाची सूचना - सर्व परीरक्षकांना दि.२०/०७/२०२३ परीक्षेबाबत देण्यात आलेल्या सीलबंद पेटीमध्ये इयत्ता १० वी परीक्षेसंबंधी व इयत्ता १२ वी परीक्षेच्या विषयासंबंधीची एकत्रित गोपनिय पाकिटांचा समावेश आहे. सबब दि. ०२/०८/२०२३ रोजी फक्त इ.१० वी ची परीक्षा असल्याने इयत्ता १० वी सबंधित विषयाची गोपनीय पाकिटे काळजीपूर्वक व विषय,माध्यम,दिनांक इ. ची खात्री करुन त्याप्रमाणे केंद्रनिहाय वाटप करण्याची दक्षता घ्यावी व इयत्ता १२ वी संबंधी सर्व विषयाची गोपनीय पाकिटे सदर पेटीतच सीलबंद करुन ठेवावीत व निर्धारित दिनांकास म्हणजेच दि.११/०८/२०२३ रोजी संबंधित केंद्राना देण्याबाबत कार्यवाही करावी.कोणत्याही परिस्थितीत इयत्ता १२ वी परीक्षा विषयाची गोपनीय पाकिटे दि.०२/०८/२०२३ रोजी उघडली जाणार नाहीत व गोपनीयतेचा भंग होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.**

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी
मुख्याध्यापक /प्राचार्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,
सातारा,सांगली,कोल्हापूर